**आधार प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन प्राप्त होणा-या निधीचा विनियोग करण्याची कार्यपध्दती**

## महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग/माहिती तंत्रज्ञान संचालनालय,**
**शासन निर्णय क्रमांकः मातंस २०१०/प्र. क ४८/३९**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांकः २८ जानेवारी २०११**

**वाचा** :-१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण १०१०/प्र. क्र -१०/१०/१८(र.व.का.)
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र मातंस २०१०/प्र क्र७१/का-३९ दि.९.९.२०१०
३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र मातंस २०१०/प्र क्र ७१/का-३९ दि. २४.९.२०१०

जनसंख्या शास्त्रीय व जैवशास्त्रीय माहितीचे संकलन करुन देशातील रहिवाशांना विशिष्ठ ओळख क्रमांक (Unique Identification number) देण्यासाठी "आधार" या प्रकल्पाची आखणी करण्यात आलेली आहे. हा प्रकल्प केंद्र शासनाचा आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय नियोजन आयोगाच्या नियंत्रणाखाली विशिष्ठ ओळख प्राधिकरण (Unique Identity Authority of India (UIDIA) ची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात हा प्रकल्प राबविण्याची जबाबदारी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडे सोपविण्यात आलेली असून राज्यात "आधार" क्रमांकासाठी नोंदणी करण्याची प्रक्रीयेला यापुर्वीच सुरवात झालेली आहे. आधार प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन निधी उपलब्ध होणार आहे. मार्च २०१२ पर्यंत देशभरात होणाऱ्या पहिल्या २० कोटी यशस्वी नोंदणीसाठी प्रत्येक नोंदणीमागे रु. ५०/- प्रोत्सहनार्थ देण्यात येणार आहे.

२. राज्यात "आधार" प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता आणि या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी / अर्थसहाय्याचे वाटप इत्यादी साठी कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनां प्रमाणे "आधार" प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी आणि केंद्र शासनाकडुन मिळणा-या निधीच्या विनियोजनासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतलेला आहे:-

**शासन निर्णयः-**

i) जिल्हयात "आधार" प्रकल्प राबविण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची तर महानगरपालिका क्षेत्रात प्रकल्प राबविण्याची जबाबदारी महानगरपालिकेच्या आयुक्तांची राहील.

ii) प्रत्येक यशस्वी नोंदणीसाठी केंद्र शासनाकडुन मिळणा-या रु. ५०/- प्रोत्साहनपर रक्कमेचे वाटप खालील प्रमाणे करण्यात येईल.

अ) प्रत्येक यशस्वी नोंदणीमागे यथास्थिती जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना रु. ५/-देण्यात येतील, त्यातील ४०% तालुका / प्रभाग पातळीवर करण्यात आलेल्या प्रशासकीय बाबींवर खर्च करता येतील. प्रशासकीय बाबी वरील खर्चात प्रकल्पाला

चालना देण्यासाठी केलेल्या जाहिराती वरील खर्च, प्रकल्पा अंतर्गत करण्यात येणा-या नोंदणी प्रक्रीयेवर देखरेख ठेवण्यासाठी करण्यात आलेला खर्च, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या प्रवासाचा व दैनिक भत्यावरील खर्च, प्रकल्प राबविण्याकरीता आयोजित केलेले प्रशिक्षण, त्यावेळी दिलेले भोजन यासारख्या बाबींचा समावेश असेल.

ब) नोंदणी करण्याच्या प्रक्रीयेसाठी ओळख पडताळणीचे काम करणा-या व्यक्तीला त्याने केलेल्या प्रत्येक पडताळणीसाठी रु. २/- याप्रमाणे प्रत्येक यशस्वी नोंदणी साठी आधार क्रमांक दिल्यानंतर.

क) नोंदणीच्या प्रक्रीयेत ओळखकर्ता म्हणुन काम करणा-या व्यक्तीला प्रत्येक यशस्वी नोंदणी साठी आधार क्रमांक दिल्यानंतर रु. १/-.

ड) आधार क्रमांक नोंदणीसाठी निनवड झालेल्या संस्थांना दयावयाचा निधी.

इ) उपरोक्त "अ", "ब", "क", आणि "ड" ही खर्चाची रक्कम वजा जाता उरलेली रक्कम राज्याच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाला आधार प्रकल्पावर होणारा प्रशासकीय खर्च आणि आधार प्रकल्पाशी संबंधीत योजना विकसीत करण्यासाठी वापरण्यात येईल.

३. प्रत्येक नोंदणीमागे देण्यात येणारी रु. ५०/-प्रोत्साहनपर रक्कम केंद्र शासनाकडुन उपलब्ध होत राहिल तोपर्यंत देण्यात येईल. या रक्कमेत केंद्र शासन ज्या प्रमाणे फेरबदल करील त्या नुसार राज्यात फेरबदल करण्यात येतील. केंद्र शासनाकडुन मिळणारे अनुदान यथास्थिती जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना यशस्वी आधार क्रमांकाच्या निर्मीतीच्या संख्येनुसार दरमहा देण्यात येतील.

४. केंद्र शासनाकडून दारिद्र्यरेषेखालील (B P L) प्रत्येक यशस्वी नोंदणी साठी रू.१००/-या प्रमाणे अनुदान यथास्थिती जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांना आधार क्रमांकाच्या निर्मीतीच्या आकडेवारी नुसार दरमहा अदा करण्यात येईल. ही रक्कम त्या व्यक्तीच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँकखात्यात जमा करण्यात येतील.

६ दारिद्ररेषेखालील "आधार" योजनेच्या लाभार्थ्यांनी नोंदणी करतेवेळी बँकेत खाते उघडले आहे किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी यथास्थिती जिल्हाधिकारी /आयुक्त महानगरपालिका आयुक्त यांची राहिल.

७ राज्यातील आधार प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा राज्यस्तरिय सेतु सोसायटीच्या खात्यामध्ये ठेवण्यात यावा व आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय सेतु सोसायटी, महानगर पालिका यांना सदर निधी वितरित करण्यात यावा. महानगरपालिकेने याकामाकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडुन त्यामध्ये सदर निधी जमा करावा.

८ "आधार" योजनेची नोंदणी प्रक्रीया त्यांचे वेगवेगळे उपयोग आणि त्याचे फायदे याची माहिती जनतेला व्हावी यासाठी लोकांचे प्रबोधन करण्याची जबाबदारी यथास्थिती संबंधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्तांची राहिल. त्यासाठी आवश्यक असणारा निधी आधारच्या व्यवहारासाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र खात्यात जमा करण्यात येईल.

९. आधार योजनेच्या प्रसारासाठी लागणारे साहित्य, माहिती पत्रके, भित्तीपत्रके, फलक इत्यादी नमुना विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडुन उपलब्ध झाल्यानंतर पुरविण्यात येईल.

१०. आधार योजना राबविण्यासाठी जनजागृती करण्यासाठी आणि ती यशस्वी करण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकांनी पाऊले उचलावित व त्याकरिता या शासन निर्णयाने तसेच या संदर्भात यापुर्वी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

११. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर २०१३०१२८२०५०३१७००९ उपलब्ध आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

**(डॉ.नितीन करीर)**
**सचिव (माहिती तंत्रज्ञान)**
**महाराष्ट्र शासन**

प्रति,

सर्व विधान सभा/ विधान परिषद सदस्य
मा. राज्यपाल याचे सचिव
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
उप महासंचालक, विशिष्ट ओळख प्राधिकरण, क्षेत्रीय कार्यालय, मुंबई
महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयत) -१/२ महाराष्ट्र , मुंबई/ नागपूर
महालेखाकार (लेखापरीक्षा) - १/२ महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगर पालीकांचे आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व कोषागारे
निवड नस्ती